Aayushi International Interdisciplinary Research Journal ( AIIRJ ) | ISSN 2349-638x | Special Issue No. 44

# रोस्टोच्या प्रतिमानातील विकास अवस्था : विशेष संदर्भ लातूर शहर, महाराष्ट्र

**डॉ. सुरेश ज्यो. फुले**
संशोधक मार्गदर्शक, भूगोल विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**कु. स्वाती पटणे**
संशोधक

**सारांश :**

जगामध्ये पहिले नगर जे तयार झाले असेल ते निश्चितपणे लहान आकाराचे असणार आणि त्यावेळी शहर व नगर यांच्यात फरक करणे अवघड होते. नवनवीन शोध लागून आधिक मोठया वसाहती तयार होऊ लागल्या. गावाचा व शहरांचा विकास होत गेला. इ.स. पूर्व ३००० पासून नवीन शोधाचा प्रभाव इजिप्त मेसोपोटेमिया आणि भारतावर झाला. या देशांमध्येच वसाहती निर्माण झालेल्या आहेत. तसेच प्राचील काळामध्ये नागरीकरण मर्यादित स्वरुपात आढळून येते.

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे इ.स. १९६५ सालापर्यंत तरी भारतीय जनगणनेच्या अहवालामध्ये नागरीकरणाला फारसे महत्त्व दिलेले नव्हते. इ.स. १९६७ च्या जनगणनेनंतर भारतातील नागरिकरणाच्या पध्दतशीर अभ्यासाला आरंभ झाला. इ.स. १९०१ ते १९११ या दहा वर्षाच्या काळात नागरी लोकसंख्या वाढीचा दर कमी होता मात्र पुढच्या दहा वर्षात म्हणजे १९११ ते १९२१ या काळात त्यात एकदम वाढ झाली. त्यानंतरच्या तीन दशकांमध्ये म्हणजे १९२१ ते १९५१ पर्यंत नागरी लोकसंख्येच्या वाढीचा दर झपाटयाने वाढत गेला.

**बीज -** रोस्टो प्रतिमान, विकास, पारंपारिक समाज इत्यादी

**प्रस्तावना :**

मानवी संस्कृतीचा विकास नगर विकासाबरोबर झालेला दिसून येतो. आज नगर म्हणजे आधुनिक किंवा विकसित संस्कृतीचे केंद्र मानले जाते. याच शहराच्या माध्यमातून आर्थिक विकास होत असतो. आर्थिक विकासाची प्रक्रिया स्पष्ट करणारे एक वैशिष्टयपूर्ण आणि महत्त्वकांक्षी प्रत्यन म्हणजे प्राध्यापक डब्ल्यू. रोस्टो यांच्या विकास अवस्था सिध्दांत होय. हे एक आर्थिक विकास अवस्था स्पष्ट करणारे प्रतिमान आहे. हा प्रतिमान म्हणजे आधुनिक विकास अवस्थाचे बारकाईने, अभ्यासपूर्ण आर्थिक विकासाचे निष्कर्ष आहेत. हे निष्कर्ष केवळ अंदाज नसून समाज व्यवस्थामधील प्रत्यक्ष बदलांचे स्पष्टीकरण देण्याचा एक प्रयत्न आहे. आर्थिक प्रवृत्ती व आर्थिक स्थितीतील दुवे एकत्रित करण्याचा प्रयत्न या प्रतिमानात दिसून येतो. रोस्टो यांच्या प्रतिमानामध्ये अर्थव्यवस्थेचा विकास पाच अवस्थामधून होतो हे स्पष्ट केले आहे. रोस्टोनी भांडवलशाही विकासाऐवजी विकास हा राजकीय व सांस्कृतिक इच्छेतून होतो असे रोस्टोचे मत होते. रोस्टोच्या वरील मताप्रमाणे लातूर शहराला भांडवलशाही अर्थव्यवस्था नसताना देखील राजकीय आणि सांस्कृतिक इच्छेतून विकास झालेला आहे. यामुळेच संशोधन पत्रिकेसाठी या प्रतिमानाप्रमाणे लातूर शहराचा विकास अवस्था मांडण्याचा प्रयत्न पुढील प्रमाणे केला आहे.

**अभ्यासक्षेत्र :**

१९८२ मध्ये उस्मानाबाद जिल्हयातून निर्माण झालेला जिल्हा व शहराचे ठिकाण आहे. शहराचा अक्षवृत्तीय विस्तार १८° २२' उ. ते १८° २६' उ. आहे तर ७६° ३२पू. ते ७६° ते ३७' पू. रेखावृत्तीय विस्तार आहे. शहराच्या पूर्वेस औसा रोड, पश्चिमेस बार्शीरोड शहराचे एकूण क्षेत्रफळ ३२.५५ चौ.कि.मी. इतके आहे. शोधनिबंधासाठी निवडलेले अभ्यासक्षेत्र हे महाराष्ट्र राज्याअंतर्गत येत असून हे एक मागास भागातील म्हणजेच मराठवाडा विभागातील एक जिल्हा म्हूणन ओळखला जातो. विकसित होवू पाहणारा व आर्थिकदृष्टया आणखीनही सक्षम न झालेला जिल्हा आहे.

अभ्यासक्षेत्रामध्ये एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोकसंख्या प्राथमिक उद्योगांमध्ये गुंतलेले दिसून येते. अभ्यासक्षेत्रामध्ये ९२२ ग्रामीण आणि ५ नागरी केंद्र येतात. एकूण ५ नागरी केंद्रापैकी लातूर हे 'अ' दर्जामधील शहर आहे. हेच ठिकाण जिल्हयाचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. या पाठोपाठ उदगीर, निलंगा, औसा व अहमदपूर यांचा समावेश होतो. या ५ नागरीकेंद्रापैकी लातूर नागरी क्षेत्र हे गाभा क्षेत्र म्हणून ओळखले जाते.

**उद्देश :**

सदर संशोधनाचे प्रमुख उद्देश हा रोस्टोच्या विकास अवस्थेतील बदल सदरील अभ्यासक्षेत्राशी जूळवून विकास अवस्था दर्शविणे असा आहे याबरोबर खालील उद्देश निश्चित केली आहेत.

१. अभ्यासक्षेत्रातील नगराचे स्थान, विस्तार, उत्क्रांती व विकास यासंबंधी माहिती मिळविणे.
२. अभ्यासक्षेत्रातील विविध सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय सोयी-सुविधांचा अभ्यास करणे.
३. अभ्यासक्षेत्रातील नगरांच्या विविध समस्येचा अभ्यास करणे.
४. नागरी व त्या लगतच्या झालर क्षेत्रात सुरु असलेला अनिर्बंध व अनियमित विकास नियंत्रित करणे, त्याचप्रमाणे सेवा-सुविधा वरील ताण, जमिनीच्या वाढत्या किंमती, प्रदुषण, पाणीटंचाई इ. भेडसावणाऱ्या प्रश्नांचा सर्वसाधारण अभ्यास करुन त्याच्या योग्य नियत्रंणासाठी अभ्यास करणे.

**अभ्यासपध्दती व माहिती स्त्रोत :**

संशोधन पत्रिका हा द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे. अभ्यासासाठी लातूर शहराची निवड केल्यामुळे प्रकाशित व अप्रकाशित माहिती स्त्रोतातून घेतली आहे. या द्वितीय स्त्रोतात जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन व जनगणना पुस्तिकाचा समावेश होतो. तसेच जनगणना हा घटक विचारात घेण्यासाठी १९८१ ते २०११ हा कालखंड विचारात घेतलेला आहे. त्याचप्रमाणे विविध संख्यात्मक तंत्रे व नकाशाशास्त्राचा वापर करुन वेगवेगळी ठिकाणे अभ्यासण्यात आलेली आहेत. योग्य ठिकाणी नकाशे वापर करुन विविध घटकांची माहिती देण्यात आलेली आहे.

**विकास आवस्था :**

**आत्मनिर्भर आवस्था -** स्थानिक लोकांचे उत्पादन वाढ नोकर वर्ग वृध्दीगत, सुरक्षेत वाढ इ.

**अतिउपयोगावस्था -** राष्ट्रीय स्तरावरील वाढ, मुलभूत गरजाबरोबर, शहरीकरण, औद्योगिकरण, सेवा क्षेत्रामध्ये वाढ, भांडवली वस्तूपेक्षा उपभोगी वस्तूउत्पादनांवर आधिक भर.

**उड्डान अवस्था -** हा काळ २०-३० वर्षाचा असून विकासाचे टर्निंग पॉईट म्हणून यास ओळखले जाते. यामध्ये औद्योगिक क्रांती मोठया प्रमाणात घडून येते.

**उड्डान पूर्वआवस्था -** हा काळ १०० वर्षाचा मानलेला असून यामध्ये व्यापार उद्योग, शेती तंत्रामध्ये बदल, आशावादी विचारप्रणाली आढळते.

**पारंपारिक आवस्था -** या काळात अर्थव्यवस्था स्थिर असून दैववादावर आधारित अर्थव्यवस्था आढळते. केंद्रीय सत्तेचा अभाव, राजकीय संगठन पारंपारिक शेतीतंत्राचा वापर, विकासाची गती मर्यादित स्वरुपात आढळते.

**प्राथमिक किंवा पारंपारिक अवस्था :**

इ.स. पूर्व २५० ते २२७ पर्यंत महाराष्ट्रात सातवाहनांची सार्वभौम सत्ता होती. या राजवटीने महाराष्ट्रात एकूण ५०० वर्ष राज्य केले. या वेळेस पैठण ही राजधानी होती. यानंतर इ.स. ४थ्या, ५ व्या व ६ व्या शतकात काही शिलालेख आणि ताम्रपट या आधारावर राष्ट्रकुटाचे राज्य या ठिकाणी होत राष्ट्रकुटाच्या काळात लातूर ही राजधानी होती. त्यानंतर महाराष्ट्रावर राज्य करणारा एक मोठा वंश म्हणून यादवांचा संदर्भ होतो. यादव कालीन राजवटीत लातूरची प्राचीनता अधिकच स्पष्ट होते. याचा पुरावा म्हणून उदगीर तालुक्यातील कानेगाव येथील ७ डिसेंबर १२५८ चा शिलालेख महत्त्वाचा ठरतो. याशिवाय अंबाजोगोई येथील श्वोलेश्वराच्या मंदिरात असलेल्या शिलालेखातही लातूर क्षेत्र असल्यामुळे वाहतूकीची कसलीही सुविधा त्यावेळी नव्हती. नगरावती अनेक राज्यकर्त्यांनी राज्य केले गेल्यामुळे त्यांच्या लोक जीवनात कसालाही बदल या राज्यकर्त्यांनी केला नाही. इ.स. ८ व्या शतकामध्ये भारतामध्ये निजामांनी प्रवेश केलेला होता. १९५६ पर्यंत महाराष्ट्राच्या काही भागावर विशेषतः मराठवाडयावर त्याचे राज्य होते. म्हणूनच राज्यकर्त्यांनी या कालावधीत लोकांना अधिक गुलामीत कसे ठेवता येईल याकडे लक्ष दिले. विकासाकडे त्यांनी पूर्णता दुर्लक्ष केले. थोडक्यात प्राथमिक अवस्थेत फारसा कोणताही विकास झाला नाही.

**उड्डाण पूर्वअवस्था :**

पहिल्या महायुध्दाच्या म्हणजे इ.स. १९१८ ते १९२५ च्या काळात ज्ञानकोशकार केतकरांचा द्वौरा या प्रांतात झाला. १९२६ साली त्यांनी प्रसिध्द केलेल्या ज्ञानकोशात लातूर हे १०००० वस्तीचे पण कापूर आणि अन्नधान्याच्या व्यापाराचे एक प्रमुख केंद्र होते. यामुळे पांरपारिक अवस्थेतनंतर येणारी आर्थिक विकासातील ही दूसरी अवस्था प्राथमिक जीवनाला थोडा वेगळा मोड मिळवून देते. लातूर हे कापूस आणि अन्नधान्याच्या व्यापाराचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते.

सुमारे ३०० वर्षांपूर्वी आजचे खडक हनुमान मंदिर ही लातूरची दक्षिणेकडील सीमा होती. उत्तरेकडील जुने गाव हेच मुळचे लातूर होते. कालांतराओ हे वाढत वाढत जाऊन व्यापाराचे केंद्र बनत गेले. लातूरला व्यापारी केंद्र म्हणून परदेशापर्यंत ख्याती प्राप्त करुन देणारे भारताच्या इतिहासातील, स्वातंत्र्य युध्दातील श्री लोकमान्य टिळक हे होते. यांनी १८११ मध्ये श्री परांजपे यांच्या देखरेखीखाली लातूर जिनिंग फॅक्टरी स्थापन केली. गिरणीमुळे अनेक लोक शेती व्यतिरिक्त व्यापाराच्या कारणाने ते लातूरला आले. येथील स्थायी मालमत्तेचे मालक बाले. १८९८ ते १८९९ या कालावधीत प्रचंड मोठा दुष्काळ ओढावला. या स्थितीत ही लातूर शहारातील व्यापारानिमित्ताने बार्शी प्रमाणे लातूरला ही मिळत होते. पुढे पुढे लातूरने गरुड क्षेपच घेतली. कारण लातूरला १९११ मध्ये बार्शी लाईट रेल्वे सुरु झाली. रेल्वेमुळे व्यापाराचे जाळे वाढण्यास मदत झाली त्यातच स्वदेशी प्रेम वाढल्यामुळे स्वदेशी व्यापारास चालना मिळाली.

या स्थितांतराबरोबर शहरामध्ये विविध कारणांसाठी भाडेकरु व्यापाऱ्यांची संख्या वाढू लागली त्यामुळे प्राथमिक अवस्थेतील शहरातील लोकसंख्या शेतीवर आधारित होती ती आता कमी होवून उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण वर अधारित राहू लागली. गंजगोलाई हे व्यापराचे केंद्र बनले. येथे कापड दुकाने, भांडी दुकाने, स्टेशनरी, सोन्याचे दुकाओ याला पुरक व्यवसायाची कार्यालये अशी विविध केंद्रे निर्माण झाली.


रोस्टोच्या मतानूसार हा काळ १०० वर्षाचा मानला जातो परंतु उड्डानपूर्व अवस्था गाठण्यासाठी लातूर शहराला इ.स. ३०० ते स्वातंत्र्यापर्यंतचा काळ लागला. रोस्टोंने सांगितल्याप्रमाणे शेतीबरोबर उद्योगांची निर्मिती अधिक झाली, लोकसंख्याही वाढली. वाढत्या लोकसंख्येला अनुसरून शेती उत्पादनात तंत्र व यंत्राचा वापर केला गेला. शहरात भांडवल निर्मिती करण्यात आली. कापड गिरणी सोबत इतर ही कारखाने या ठिकाणी निर्माण झाले. यातूनच समाजामध्ये दैववादी विचारातून आशावादी विचार निर्माण झाले. शेतीचा विकास झाला, उपलब्ध साधनसंपत्तीचा पुरेपूर उपयोग होऊ लागला. यामुळे आर्थिक उन्नति सुरु झाली या सर्व संक्रमण काळानंतर आर्थिक गतिशिलता मिळाल्यानेच उड्डान अवस्था निर्माण होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

**उड्डान अवस्था :**

रोस्टोने सांगितलेल्या दुसऱ्या अवस्थेनंतर येणारी ही तिसरी अवस्था होय. उड्डान हा शब्द रोस्टोने अतिशय योग्य अर्थाने वापरला आहे. आकाशात क्षेप घेण्यापूर्वी विमानाला प्रचंड वेग घ्यावा लागतो. ठराविक विमानाचे उड्डान होत असते. मागील अवस्थेमध्ये लातूर शहराची आर्थिक प्रगती वेगाने वाढण्यास मदत झाली. याच अवस्थेमध्ये सांगितलेल्या किमान अटी पूर्ण झाल्या. विकासाचे एक टर्निंग पॉईंट प्राप्त झाले. यामुळेच विकास ही सामान्य प्रक्रिया बालेली दिसून येते. व्यक्तीच्या प्रत्येक इच्छा पूर्ण करणारी ही अवस्था आहे. म्हणूनच या अवस्थेला रोस्टोनी उड्डान अवस्था ही औद्योगिक क्रांती असे मानले आहे. हा काळ २० ते ३० वर्षाचा मानला जातो.

लातूरात उद्योगाची स्थिरता, गुंतवणूकीमध्ये वाढ, राहणीमानामध्ये वाढ, शहराच्या क्षेत्रामध्ये वाढ, नवावीन उद्योगधंद्यांची गुतांगुंत, शेतीतील बदल, शैक्षणिक सुविधातेत वाढ, सामाजिक सेवा, नागरी सेवा सुविधा व प्रबल राजकीय इच्छाशक्ती यामुळे उड्डान अवस्था लातूरने गाठलेली दिसून येते.

रोस्टोने सांगितल्याप्रमाणे लातूर सद्या उड्डान अवस्थेमध्ये आहे. लातूर शहरामध्ये शहरीकरण, औद्योगिकरण, सेवा क्षेत्रात वाढ, भांडवली वस्तूपेक्षा उपभोगी वस्तू उत्पादनावर अधिक भर आणि समाजकल्याण व सुरक्षिततेत वाढ या घटकांसोबत लातूर शहरात नागरीकरणाच्या उच्च सेवांचा अभाव, सेवा क्षेत्रांचा विकास नाही, लोकांच्या चैनीमध्ये व सुखामध्ये वाढ नाही, सुरक्षितेत वाढ नाही, करमनुकीच्या साधनात वाढ नाही. मोठया प्रमाणात समाज परिवर्तन दिसून येत नाही. एकूणच म्हणता येईल हवे ते बदल झालेले नाहीत. म्हणूनच रोस्टोच्या ४ व ५ व्या अवस्थेमधे लातूर शहर पोहचले नाही.




**निष्कर्ष :**

१. शहराचा विस्तार पश्चिम व दक्षिण भागाकडे वाढत चाललेले आहे. २०११ मध्ये महानगरपालिकेची निर्मिती होवून शहराच्या सीमा सभोवतालच्या क्षेत्रामध्ये वाढ करण्यात आली आहे. शहराच्या पश्चिम भागामध्ये उद्योगक्षेत्र असल्याकारणाने शहराचा विस्तार व विकास या भागाकडे होत आहे.

२. लातूर शहर हे जिल्हयाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. यामुळे शहरामध्ये सर्वच सोयी सुविधा उपलब्ध असतात. त्याचबरोबर लातूर हे शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जात आहे. शिक्षणामध्ये लातूर शहराचा मोठया प्रमाणात विकास झालेला आहे.

३. नागरी व त्या लगतच्या झालर क्षेत्रात सुरू असलेल्या अनिर्बंध व अनियमित विकास नियंत्रित करणे, त्याप्रमाणे सेवा सुविधावरील ताण, प्रदुषण, घर टंचाई इ. प्रश्नांवर उपाययोजना राबविल्या नाहीत.

४. रोस्टो यांनी विकासाच्या पाच अवस्था सांगितल्या आहेत. परंतु लातूर शहर पहिल्या तीन अवस्थेमध्येच दिसून येतात. रोस्टोच्या विकास अवस्थेच्या सिद्धांतावरून असे लक्षात येते की लातूर शहराचा औद्योगिकरण, शहरीकरण, सुरक्षितता यामध्ये अद्याप विकास झालेला नाही.

**शिफारसी :**

१. प्राकृतिकदृष्टया शहराचा विकास होत आहे. पण नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपुरा पुरवठा आहे. यामुळे जिल्हयातील व शहराच्या प्रत्येक रिकाम्या जागेवर, रस्त्यांच्या बाजूने जास्तीत जास्त वृक्षांची व वंनाची लागवड करावी.

२. भांडवली वस्तू निर्मिती उद्योगांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे जेणेकरुन विकासाची गती वाढण्यास मदत होईल.

३. बाजारपेठेचे विस्तारीकरण करण्यासाठी शहराच्या चारही बाजूची निवड करण्यात यावी. मध्यवर्ती असणारी दुकानांची गर्दी कमी करुन वार्ड निहाय अल्पदरात उपलब्ध होणारी मोठी मॉल निर्माण करावीत व शहरातील मालमत्तेच्या किमंतीमध्ये स्थिरता आणणे आवश्यक आहे.

४. लोकसंख्या वाढ व वितरण शहरातील सगळया भागात समान स्वरुपात आणने आवश्यक आहे जेणे करुन एकाच वार्डावर आधिक ताण पडला जाणार नाही.

५. रस्त्यांचे रुंदीकरण करणे गरजेचे आहे व जास्तीत जास्त फुटपाथाची निर्मिती करणे आवश्यक आहे. तसेच शहरातील मुख्या समस्या म्हणजे पार्कींगची व्यवस्था नसणे. कोणत्याही भागात, बाजारात वाहने पार्क करण्यासाठी वाहनतळ निर्माण केले नाही. त्यासाठी जुन्या शासकीय इमारती, रिकाम्या जागा, रस्त्यावरील अतिक्रमण हटवून वाहनतळ उभे करावे.

६. औद्योगिक रचना बदलली जावी जास्तीत जास्त तृतीय, चतुर्थ व पंचम व्यवसाय उभा करण्याकडे किंवा स्थापन करण्याकडे प्रशासनाने भर द्यावा.

**संदर्भग्रंथ :**

१) *सौताडेकर व्ही. एस. (२००३) : लातूर काल आणि आज विलासराव देशमुख फाऊंडेशन लातूर*

२) *डॉ. जयद्रथ जाधव (२०१७) : लातूर : वसा आणि वारसा प्रकाशक - वितरक*

३) *प्रा. शंकरराव शेटे, प्रा. सुरेश फुले, प्रा. ओमप्रकाश शहापूरकर (१९९८) : लोकसंख्या भूगोल*

४) *दंडे व्ही. सी. (२०१२) : "लातूर जिल्हयातील नागरी केंद्राचा भौगोलिक अभ्यास", अप्रकाशित शोधप्रबंध स्वा.रा.ती.म.वि. नांदेड*

५) *रॉजर हिम (२००५) : 'दक्षिण पश्चिम प्रदेश वसल्याच्या कार्यप्रणालीचे विश्लेषण '*

६) *डॉ. गोडबोले बी. एम. (२०१६) : "Latur - A Study In Urban Geography" P.hd Thesis, SRTMU Nanded.*